**कोटक महिंद्रा प्राईम लिमिटेड**

**निष्पक्ष आचरण संहिता**

**प्रस्तावना**

भारतीय रिझर्व्ह बँकेने तिच्या प्रमुख निर्देशांद्वारे नॉन बँकिंग फायनान्शियल कंपन्यांसाठी खंड VI - नॉन बँकिंग फायनान्शियल कंपनीद्वारे रोजी अनामत रकमा न स्विकारणारी संस्था व अनामत रकमा स्विकारणारी संस्था यांच्याद्वारे 01 सप्टेंबर, 2016 रोजी निष्पक्ष आचरण संहितेवर मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत, ज्यायोगे वैयक्तिक ग्राहकांसोबत व्यवहार करताना आणि सर्वोत्कृष्ट कॉर्पोरेट सेवा पुरविण्यासाठी निष्पक्ष आचरण मानके स्थापित करतात.

सर्व पात्र अर्जदारांना त्यांच्या वर्ण, जात, रंग, धर्म, लिंग, वैवाहिक स्थिती, वय अथवा अपंगत्व यांच्या आधारावर कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करता त्यांना कर्ज उत्पादने उपलब्ध करून देणे हेच आमचे धोरण आहे व राहील.

सर्व ग्राहकांशी सुसंगतपणे आणि निष्पक्षपणे वागणे आमचे धोरण आहे. आमचे कर्मचारी निष्पक्ष, न्याय्य आणि सुसंगत पद्धतीने सहाय्यता, प्रोत्साहन आणि प्रदान करतील. तसेच आम्ही आमची निष्पक्ष आचरण संहिता इंग्रजी आणि मुख्य स्थानिक भाषांमध्ये कंपनीच्या वेबसाईटवर ठेवून आमच्या ग्राहकांना देखील ज्ञात करू.

संभावित कर्जदारांना व्याजावर परिणाम करणारी शुल्के/फीज कर्जदारांना योग्य रीतीने कळवली जातील याची आम्ही खात्री करू. या सुविधेशी संबंधित अटी आणि शर्ती संभावित ग्राहकांना कळवली जातील. कर्ज देण्याच्या निर्णयातून उद्भवणारे वाद आम्ही स्थापित केलेल्या तक्रार निवारण यंत्रणेद्वारे योग्य रीतीने सोडविण्यासाठी आम्ही वचनबद्ध आहोत.

निष्पक्ष आचरण संहितेच्या अंमलबजावणी संपूर्ण संस्थेची जबाबदारी असेल याची आम्ही सुनिश्चिती करू. कंपनीची निष्पक्षपणे कर्ज देण्याची पद्धत मार्केटिंग, लोन ओरिजिनेशन, प्रकिया, सेवा पुरविणे आणि वसुलीच्या क्रियांसहित आमच्या कार्यांच्या सर्व बाबींसाठी लागू होतील. निष्पक्ष आचरण संहितेसाठी आमची वचनबद्धता कर्मचाऱ्यांची जबाबदारी, निरीक्षण आणि ऑडिटिंग प्रोग्राम्स, प्रशिक्षण आणि तंत्रज्ञानाच्या स्वरूपात प्रदर्शित होते.

कंपनीचे संचालक मंडळ आणि व्यवस्थापन संघ आमची कार्ये निष्पक्ष कर्ज वाटपासाठी आमची तीव्र प्रतिबद्धता प्रतिबिंबित करतील याची खात्री करण्यासाठी रचलेल्या पद्धती स्थापित करण्यासाठी जबाबदार आहेत.

कोटक महिंद्रा प्राईम लिमिटेड (केएमपीएल) त्याच्या ग्राहकांसाठी सर्वोच्च गुणवत्तेची सेवा पुरविण्यासाठी वचनबद्ध आहे.

ही निष्पक्ष आचरण संहिता आम्ही उपलब्ध करत असलेल्या उत्पादने आणि सेवांच्या खालील श्रेणींसाठी लागू आहे (सध्या देऊ केल्या जाणाऱ्या किंवा भविष्यातील तारखेस प्रस्तुत केले जाऊ शकेल असे)

1. केएमपीएलद्वारे उपलब्ध केली जाणारी कर्जे आणि इतर आर्थिक उत्पादने
2. आमच्या नेटवर्कद्वारे प्रस्तुत केली जाणारी त्रयस्थ पक्षाची उत्पादने

शाखेत, फोनवर, इंटरनेटवर किंवा आम्ही सध्या वापरत असलेल्या किंवा भविष्यातील तारखेला सादर करू शकत असलेल्या इतर कोणत्याही पद्धतीद्वारे प्रदान केले गेले असले, तरीही वरील गोष्टींना निष्पक्ष आचरण संहिता लागू होते.

(संहितेत केलेली वचनबद्धता सामान्य कामाच्या वातावरणाच्या अंतर्गत लागू आहे)

**मुख्य वचनबद्धता**

आमच्या ग्राहकांशी व्यवहार करताना आम्ही ज्या मुख्य वचनबद्धतेचे पालन करण्याचे वचन देतो ते आहेत:

a. खालील बाबी सुनिश्चित करून आमच्या ग्राहकांसोबतच्या सर्व व्यवहारांमध्ये निष्पक्ष आणि वाजवीपणे वागणे:
   - आमची उत्पादने, सेवा, कार्यप्रणाली आणि पद्धती या संहितेतील वचनबद्धता आणि मानकांची पूर्तता करतील.
   - आमची उत्पादने आणि सेवा संबंधित कायदे आणि नियमनांची पूर्तता करतील
   - आमच्या ग्राहकांसोबतचे आमचे व्यवहार एकनिष्ठता आणि पारदर्शकतेच्या नैतिक तत्त्वांवर अवलंबून असतील.

b. आमची आर्थिक उत्पादने आणि सेवा कशा रीतीने काम करतात हे समजून घेण्यात आम्ही ग्राहकांना मदत करू
   - त्यांच्याबद्दल साध्या हिंदी आणि/किंवा इंग्रजी आणि/किंवा स्थानिक भाषेत माहिती देणे
   - त्यांचे आर्थिक परिणाम स्पष्ट करणे आणि
   - ग्राहकाला त्याच्या/तिच्या गरजा भागवतील अशा पर्यायास निवडण्यात मदत करणे.

c. ग्राहकांना आमच्याशी व्यवहार करताना कोणताही त्रास नसलेला अनुभव मिळावा यासाठी आम्ही पूर्णपणे प्रयत्न करू; पण त्यात काहीही चूक झाली, तर आम्ही ती पटकन आणि सहानुभूतीपूर्वक हाताळू
   - चुका लवकर सुधारल्या जातील
   - तक्रारी पटकन हाताळल्या जातील
   - तक्रार ज्या प्रकारे हाताळली जात असेल, त्याबद्दल ग्राहक संतुष्ट नसल्यास, आम्ही ग्राहकाला तक्रार कशी पुढे न्यावी याचे मार्गदर्शन करू.
   - आमच्याकडून झालेल्या त्रुटीमुळे ग्राहकाच्या खात्यावर लागू केलेली कोणतीही शुल्के आम्ही परत करू

d. ही संहिता आमच्या वेबसाइटवर आमच्याद्वारे प्रसिद्ध केली जाईल

## माहिती

आम्ही आमच्या ग्राहकांना त्याच्या/तिच्या आवश्यकता पूर्ण करणारी उत्पादने आणि सेवा निवडण्यासाठी मार्गदर्शन करू.

a. ग्राहक संबंध प्रस्थापित होण्यापूर्वी, आम्ही:
   - ग्राहकाने ज्या सेवा आणि उत्पादनांमध्ये रुची दाखविली आहे त्यांची मुख्य वैशिष्ट्ये स्पष्ट करणारी माहिती ग्राहकाला देऊ
   - ग्राहकांच्या गरजा भागवतील अशी खाती, उत्पादने आणि सेवांची माहिती देऊ
   - आम्हाला हवी असलेली अशी माहिती स्पष्टपणे मागू जी आमच्या केवायसी नियमांची पूर्तता करण्यासाठी आणि कायदेशीर आणि नियामक आवश्यकतांचे पालन करण्यासाठी आम्हाला ग्राहकांकडून गोळा करणे आवश्यक असेल.
   - डेटाबेस तयार करण्यासाठी ग्राहक आणि त्याच्या/तिच्या कुटुंबाविषयी अतिरिक्त माहितीसाठी विनंती करू; परंतु ही माहिती ग्राहकाची इच्छा असेल तरच घेतली जाईल.

b. त्याची उत्पादने आणि सेवा जाणून घेण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या विविध वाहिन्यांवर आम्ही माहिती उपलब्ध करू. याबाबत आणखी माहिती कोठे उपलब्ध आहे याची माहिती देखील ग्राहकाला दिली जाईल.

c. एकदा ग्राहकाने एखादे उत्पादन निवडले की ते कसे काम करते हे आम्ही ग्राहकाला सांगू.

d. ज्याच्या अंतर्गत ग्राहकाने हे उत्पादन घेतले आहे, त्याच्या कामाशी संबंधित विशेष अधिकार आणि जबाबदाऱ्यांबद्दल त्याला मार्गदर्शन करू.

e. सर्व अटी व शर्ती न्याय्य असतील आणि ग्राहकाचे हक्क आणि जबाबदाऱ्या स्पष्टपणे आणि साध्या भाषेत निर्धारित करतील. आम्ही आवश्यक असेल तिथेच कायदेशीर किंवा तांत्रिक भाषा वापरू.

## कर्ज आणि प्रक्रियेसाठी अर्ज

i. कर्जाच्या अर्जात आवश्यक असलेली सर्व माहिती समाविष्ट असेल, जिचा संभाव्य ग्राहकाच्या हितावर परिणाम होण्याची शक्यता आहे (उदा. ईएमआय, शुल्के, कालावधी, इ.)

ii. केएमपीएल सोर्सिंग टीम कर्जाचा अर्ज सादर करताना ग्राहकाकडून आवश्यक असलेल्या कागदपत्रांची यादी देऊ शकते.

iii. कर्जाचे सर्व अर्ज मिळाल्याबद्दल आम्ही पोचपावती देऊ
    पोचपावतीमध्ये ज्यात कर्जाच्या अर्जाचा निपटारा केला जाईल, अशा सूचक कालावधीस दर्शविले जाईल.

**कर्जाचे मूल्यमापन आणि अटी/शर्ती**

आम्ही ग्राहकाला वार्षिक व्याजदर, आणि अटी व शर्तींसह कर्जाची रक्कम मंजूरी पत्राद्वारे किंवा अन्यथा कळवू आणि ग्राहकाद्वारे या अटी व शर्तींची स्वीकृती कंपनीच्या नोंदीवर ठेवू.

**कर्ज करार**

i. आम्ही कर्ज कराराची प्रत सर्व संलग्नकांसह, जर असल्यास, ग्राहकांना इंग्रजीमध्ये देऊ. जर ग्राहकाला इंग्रजी समजत नसेल, तर आम्ही ग्राहकाला समजत असलेल्या स्थानिक भाषेत आशय समजावून सांगू.
ii. कराराच्या अंतर्गत पैसे माघारी मागणे/लवकर देण्यास सांगणे किंवा कार्यप्रदर्शनासाठी निर्णय संबंधित कर्ज कराराशी सुसंगत असेल.
iii. कर्जदाराच्या विरुद्ध आमच्याकडे इतर कोणत्याही अन्य दाव्यासाठी कायदेशीर अधिकार किंवा धारणाधिकार नसल्याच्या अटीवर, सर्व देय परतफेडीवर किंवा कर्जाची थकबाकी वसूल झाल्यावर आम्ही सर्व सिक्युरिटीज मुक्त करू. कर्जदाराने मान्य केलेल्या कर्ज कराराच्या अटींनुसार कर्ज समाप्त असा अधिकार वापरायचा असल्यास, कर्जदाराला उर्वरित दावे/देयके आणि अटींबद्दल संपूर्ण तपशीलांसह पुरेशी सूचना दिली जाईल ज्यांच्या अंतर्गत एनबीएफसीकडे संबंधित दावे/देयके यांचा निपटारा होईपर्यंत/आमच्या संतुष्टीनुसार पैसे भरले जाईपर्यंत सिक्युरिटीज राखून ठेवण्याचा अधिकार आहे.
iv. कर्ज कराराच्या अटी व शर्तींमध्ये प्रदान केलेल्या उद्दिष्टांव्यतिरिक्त, आम्ही कर्जदाराच्या बाबींमध्ये हस्तक्षेप करण्यापासून दूर राहू. (जोपर्यंत, कर्जदाराने यापूर्वी उघड न केलेली माहिती लक्षात येत नाही).

**व्याज दरे**

a. कर्ज घेताना, आम्ही ग्राहकाला खात्यातून व्याज कधी वजा केले जाईल याची माहिती देऊ.
b. कर्ज करारामध्ये व्याज दरांबद्दल पुरेशी माहिती असेल.
c. आम्ही कर्जदाराला व्याज दरांमध्ये होणाऱ्या कोणत्याही बदलाची सूचना देऊ आणि ती संभाव्यपणे लागू केली जाईल. या संदर्भात कर्ज करारामध्ये योग्य अट समाविष्ट केली जाईल.
d. आम्ही ग्राहकांना वेबसाइट अड्रेस आणि ग्राहक संपर्क केंद्राचे नंबर्स यासारखी माहिती देखील देऊ.

**शुल्के**

a. कर्ज करारामध्ये कोणत्याही शुल्काबाबत पुरेशी माहिती असेल.
b. आम्ही कर्जदाराला सध्या असलेल्या शुल्कांमधील बदल/नवीन सुरु केलेली यांच्याबद्दल सूचना देऊ आणि ते संभाव्यपणे लागू केले जातील. या संदर्भात कर्ज करारामध्ये योग्य अट समाविष्ट केली जाईल.
c. आम्ही कोणत्याही सेवा किंवा उत्पादनासाठी शुल्क लागू करण्यापूर्वी (ग्राहकांना) कळवू.

d. ग्राहक जेव्हापण विनंती करेल तेव्हा कोणत्याही सेवा किंवा उत्पादनासाठी आम्ही शुल्काचा तपशील उपलब्ध करू.
e. उशीरा पैसे भरल्यास त्यासाठी कर्ज करारामध्ये दंडात्मक शुल्काचा उल्लेख ठळक अक्षरात केला जाईल.
f. आम्ही वैयक्तिक कर्जदारांना, सह-कर्जदार किंवा त्यांच्याशिवाय, व्यवसायाव्यतिरिक्त इतर कारणांसाठी मंजूर केलेल्या सर्व फ्लोटिंग रेट टर्म लोनवर पूर्वसमाप्ती (फोरक्लोजर शुल्के/पूर्वभरणा दंड आकारणार नाही.
g. वेळोवेळी शुल्कातील बदल कंपनीची वेबसाइट https://www.primeloans.kotak.com येथे अपडेट केले जातात.

## कर्जांची वसुली

a. आम्ही कर्जाच्या वसुलीसाठी अनुचित छळ किंवा बलाचा वापर करणार नाही.
b. ग्राहकांशी योग्य रीतीने व्यवहार करण्यासाठी कर्मचाऱ्यांना पुरेसे प्रशिक्षण दिले जाईल.
c. कर्जाच्या करारामध्ये त्याच्याशी संबंधित अटी व शर्तींची पारदर्शकता सुनिश्चित करण्यासाठी पुनः ताबा घेण्याचे अंतर्निहित कलम असेल.
d. कोणत्याही ग्राहकाला वसुलीशी संबंधित बाबींसाठी सकाळी 8 वाजण्यापूर्वी आणि संध्याकाळी 7 नंतर किंवा आरबीआयने वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या वेळेनुसार बोलावले जाणार नाही किंवा कॉल केला जाणार नाही.

## हस्तांतरण

खाते हस्तांतरित करण्यासाठी ग्राहकाने विनंती केल्यावर, विनंती मिळाल्याच्या तारखेपासून 21 दिवसांच्या आत ग्राहकाला संमती / आक्षेप कळविले जाईल. असे हस्तांतरण कायद्यासह सुसंगत पारदर्शक कराराच्या अटींनुसार असेल.

## जाहिरात आणि मार्केटिंग

a. सर्व जाहिराती आणि प्रचारात्मक सामग्री स्पष्ट, निष्पक्ष वाजवी असल्याची आणि दिशाभूल करत नसल्याची आम्ही खात्री करू.
b. आम्ही ग्राहकांना ते पात्र असलेल्या आर्थिक उत्पादनांच्या संपूर्ण श्रेणीस उपलब्ध करू. यापैकी काही उत्पादने/सेवा आमच्या स्वतःच्या असतील; यातील काही इतर उत्पादने आमच्याशी टाय-अप व्यवस्था असलेल्या कंपन्यांच्या असू शकतात. ज्या कंपन्यांसोबत आम्ही व्यवसाय व्यवस्था केली आहे, त्यांची माहिती आम्ही ग्राहकांना देऊ आणि जर ग्राहकाची इच्छा असेल, तर आम्ही कंपनीच्या कर्मचारी/एजंटना त्यांच्या उत्पादनांचे/सेवांचे मार्केटिंग करण्याचे निर्देश देऊ.

## एफपीसी आणि तक्रार निवारणाची समीक्षा

a. संचालक मंडळ प्रत्येक तिमाहीच्या समाप्तीपासून दोन महिन्यांच्या आत, तिमाहीच्या आधारावर निष्पक्ष आचरण संहितेचे अनुपालन आणि तक्रार निवारण यंत्रणेच्या कार्याची समीक्षा करेल.
b. अशा समीक्षेचा एकत्रित अहवाल आर्थिक वर्षाच्या समाप्तीपासून दोन महिन्यांच्या आत वार्षिक आधारावर मंडळाला सादर केला जाईल.

## गोपनीयता

a. ग्राहकाने अधिकार दिल्याशिवाय आम्ही सर्व वैयक्तिक माहिती खाजगी आणि गोपनीय राखू.
b. खालील अपवादात्मक प्रकरण असल्याखेरीज, आम्ही इतर कोणत्याही व्यक्तीसमोर व्यवहाराचा तपशील उघड करणार नाही
    - आम्हाला वैधानिक किंवा नियामक कायद्याच्या अनुसार माहिती देण्याची गरज असल्यास
    - जनतेसमोर ही माहिती उघड करणे कर्तव्य असल्यास
    - आमच्या हितासाठी आम्हाला ही माहिती प्रदान करणे आवश्यक असल्यास (उदा. फसवणूक टाळणे). आम्ही मार्केटिंगच्या हेतूसाठी ग्राहकांबद्दलची माहिती कोणालाही देण्यासाठी या कारणाचा वापर करणार नाही.
    - आम्ही इतर उत्पादने किंवा सेवा प्रदान करण्यासाठी सहकारी/संस्था किंवा कंपन्यांना अशी माहिती प्रदान करण्यासाठी (उदाहरणार्थ, कर्ज मंजूर करण्याच्या वेळी) ग्राहकाची परवानगी घेतली असल्यास
    - जिथे ग्राहक आम्हाला इतर सेवा किंवा उत्पादने प्रदान करण्यासाठी अशी माहिती सहयोगी संस्था / संस्था किंवा कंपन्यांना प्रकट करण्यास सांगतो

## कर्ज आणि आगाऊ रक्कम

a. पैसे उधार देण्यापूर्वी, किंवा इतर कोणतेही कर्ज देण्यापूर्वी, आम्ही ग्राहकाच्या (कर्जदार) परतफेड करण्याच्या क्षमतेचे मूल्यांकन करू.
b. कर्ज मंजूर करण्यापूर्वी, ते मागणीवर परतफेड आहे का किंवा अन्यथा, ते ग्राहकाला कळवू

## व्याज दराचे मॉडेल

कंपनीकडे व्याज दराचे मॉडेल आहे, जे कर्ज देण्याचे दर ठरवण्यासाठी खालीलप्रमाणे संबंधित घटक विचारात घेते.

a) कर्ज देण्याचा खर्च
b) कार्यान्वयन खर्च

c) उत्पादन आणि कर्जदारासाठी रिस्क प्रीमियम
d) आवश्यक असलेल्या मालमत्तेवरील परतावा
e) आर्थिक सुविधेचा कालावधी
f) इतर कोणतेही संबंधित घटक जसे की उद्योगातील प्रचलित बाजारातील कर्जाचा दर इ.

कंपनी दर महिन्याला ॲसेट अँड लायेबिलिटी कमिटीची (ALCO) बैठक आयोजित करते, ज्यामध्ये कोषागार विभाग चर्चा करते, मार्गदर्शन देते आणि व्यवसायांना विविध कालावधीसाठी कर्ज देण्याच्या खर्चाबाबत सल्ला देते. वरीलपैकी कोणत्याही घटकामध्ये लक्षणीय बदल झाल्यास महिन्याच्या दरम्यान व्याजदर बदलण्याचा कंपनीला अधिकार आहे.

ग्राहक आणि उत्पादनांच्या श्रेणीकरण किंवा जोखमीच्या आधारावर, विविध उत्पादनांच्या अंतर्गत समान ग्राहकांसाठी समान उत्पादने किंवा विभिन्न दरांच्या वेगवेगळया ग्राहकांसाठी वेगवेगळे व्याज दर आकारतील. त्यानुसार, आकारला जाणारा व्याज दर दरसाल 6% ते 36% च्या श्रेणीत आहे.

व्याजाचे दर आणि जोखमीच्या क्रमवारीची माहिती कंपनीच्या वेबसाइटवर उपलब्ध केली जाईल. जेव्हा पण व्याजदरांमध्ये बदल होतो, तेव्हा वेबसाइटवर प्रसिद्ध असलेली माहिती अपडेट केली जाईल.

सर्व व्याजदर वार्षिक आधारावर असतील आणि ते ग्राहकांना कळवले जातील. ग्राहकाशी केलेल्या करारानुसार दंडात्मक शुल्के आकारली जातील आणि ते ग्राहकानुसार आणि/किंवा उत्पादनानुसार बदलू शकतात.

व्याजाचा दर आणि जोखमीच्या क्रमवारीची माहिती कर्जाच्या अर्जामध्ये दिलेली असते आणि ती कंपनीची वेबसाइट **http://primeloans.kotak.com/policies.htm** वर उपलब्ध आहे.

### डिजिटल कर्ज देणाऱ्या प्लॅटफॉर्म्सवरून घेतलेले कर्ज

जेथेही कंपनी कर्जदारांना कर्ज देण्यासाठी आणि/किंवा थकबाकी वसूल करण्यासाठी डिजिटल कर्ज देणारे ॲप्लिकेशन्स/कर्ज देणाऱ्या सेवा प्लॅटफॉर्म्स चालवीत असेल, त्या वेळोवेळी जारी केलेल्या डिजिटल कर्जावरील आरबीआय मार्गदर्शक तत्त्वांनुसार असतील.

### अतिरिक्त सहाय्य

### तक्रारी / तंटे आणि अभिप्राय / सूचना – अंतर्गत प्रक्रिया

a. तक्रार करू इच्छिणाऱ्या ग्राहकांना आम्ही मार्गदर्शन करू आणि ग्राहक निकालावर संतुष्ट नसल्यास काय करावे याबद्दल मार्गदर्शन करू. आमचे कर्मचारी कोणत्याही शंकांसाठी मदत करतील.

b. प्रकरणाचा तपास केल्यानंतर, आम्ही शक्य तितक्या लवकर प्रतिसाद पाठवू; जर ग्राहक संतुष्ट नसेल, तर तक्रार पुढे कशी न्यावी याबद्दल आम्ही ग्राहकाला मार्गदर्शन करू.
c. आम्ही आमच्या शाखांमध्ये तक्रार निवारण अधिकाऱ्याचे नाव आणि संपर्क तपशील प्रदर्शित करू, ज्यांच्याशी आमच्या कंपनीविरुद्ध तक्रारींचे निराकरण करण्यासाठी लोक संपर्क साधू शकतात.
d. आम्ही आमच्या शाखांमध्ये एकात्मिक लोकपाल योजना 2021 ची प्रमुख वैशिष्ट्ये आणि सेन्ट्रलाइज्ड रिसीट आणि प्रोसेसिंग सेंटर (सीआरपीसी), आरबीआयचे संपर्क तपशील प्रदर्शित करू.

**अभिप्राय आणि सूचना**

सेवा सुधारण्यासाठी आमच्या सेवांबद्दल अभिप्राय देण्याची आम्ही आमच्या ग्राहकांना विनंती करतो.

**संनिरीक्षण**

आम्ही संहितेच्या अनुपालनाची खात्री करण्यासाठी एक अधिकारी नियुक्त केला आहे. आमच्या अंतर्गत लेखापरीक्षणाच्या कार्यप्रणाली आम्ही संहितेच्या गरजा भागवतो याची खात्री करतात.

- प्रिन्सिपल नोडल ऑफिसर : मिस. डेलनाझ बलसारा
- इमेल आयडी : kprime.nodal@kotak.com
- टेलिफोन क्र. : 022-69781706

**संहितेबद्दल आणखी माहिती**

आमच्या वेबसाईटवर संहिता उपलब्ध असेल आणि विनंतीवर प्रति उपलब्ध करून दिल्या जातील

**शंका /तक्रार निवारण – तंत्र**

तक्रार निवारण कार्यप्रणालीसाठी तक्रार निवारण धोरणातील M2.01.01 पहा.